महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ,सातारा

सदरबझार, सातारा जि.सातारा पिन कोड-415001

Email :**deangmcsatara7@gmail.com** **Website:-www.gmcsatara.org**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे काल्पनिक पदे - वर्ग- 3 तांत्रिक/अतांत्रिक व वर्ग-4 संवर्गातील ( बाहयस्त्रोताने ) पदे एकत्रित वेतन रुपये 10,000/- व 8000/-वेतनावर, मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेकरिता इच्छुक असलेले अधिकृत पुरवठादार यांचेकडुन ई-निविदा अर्ज मागविण्याकरिता.

निविदा क्र.1 व 2

(वर्ग 3 व वर्ग 4 संवर्गाची पदे)

## जाहिर ई-निविदा सुचना

महाराष्ट्र राज्यस्तरीय इच्छुक ठेकेदार/ निविदाधारकांना जाहिर सुचना देणेत येत आहे की, शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,सातारा येथे काल्पनिक पदे - वर्ग- 3 तांत्रिक/अतांत्रिक व वर्ग-4 संवर्गातील( बाहयस्त्रोताने ) पदे अनुक्रमे एकत्रित वेतन रुपये 10,000/- व 8000/-वेतनावर, शासन नियमानुसार शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबतच्या ई-निविदा प्रक्रियेचा अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबतची विस्तृत माहिती संचालनालयाचे अधिकृत संकेतस्थळावर https://maharashtra.nextprocure.in यावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

उपरोक्त अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक14/03/2022 ते दिनांक11/04/2022 रोजी पर्यंत राहील. दिनांक11/04/2022 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अर्ज संकेतस्थळावर स्विकृत होतील. त्यानंतर कोणत्याही सबबीवर ई-निविदा अर्ज स्विकृत केले जाणार नाही.

टपाल/कुरियअर मार्फत कोणतेही निविदा अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक 14.03.2022 सकाळी 10.00 ते दिनांक 11.04.2022 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यत

निविदा पूर्व बैठक : दिनांक 12.03.2022 (बैठकीचे ठिकाण- अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. https://maharashtra.nextprocure.in
   ( सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
2. संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ https://www.gmcsatara.org
3. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांचे कार्यालयातील सूचना फलक

डॉ.आर.बी.चव्हाण,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,सातारा.

जा.क्र. शावैमसा/बाहयस्त्रोत निविदा क्र.1 व 2 /वर्ग-3 व वर्ग-4 पदे/204/2022

दिनांक : 03/03/2022

**E-Tender Notice- Tender No-01**

**Shedule of Bidding Activities**

| | |
|---|---|
| Tender Name | Government Medical College, Satara<br>College Side Class -3 Contractual Workers |
| A Vailability of REP Document download & Bid Uploading on http://organizations.maharashtra.nextprocure.in | Dt14.03.2022 to11.4.2022 up to 17:00hrs |
| Opening of the Tender | 12.04.2022 |
| Tender/REP form cost & earnest mony should be paid by way of online/offline payment deposited in following account receipt should be submitted in technical bid. Service provider's fees Rs.885/- (all inclusive,750/-+ taxes and banking charges) is to be paid online via payment gateway provided. | |
| Bank Name | Bank of Baroda |
| Account name | Dean, Government Medical College,Satara |
| Branch name | Satara |
| Account number (accept only Tender fees) | 04420100028804 |
| IFSC code | BARB0SATARA (Fifth character is zero ) |
| Tender fees | 5000/-( Non Refundable) |
| For any queries regarding E-tendering system please refer https://organization.maharashtra.nextprocure.in & Contact helpline no.9356468309,9356492848 &7506797596 E-Mail: helpdesk@nextenders.com | |
| **EMD Account Details** | |
| Bank name | Bank of Baroda |
| Account name | Government Medical College,Satara |
| Branch name | Satara |
| Account number ( accept only EMD amount ) | 04420100028040 |
| IFSC code | BARB0SATARA (Fifth character is zero ) |
| Estimation cost of the tender | 5880000/- |
| EMD Amount | 176400/- (Refundable) |
| For any queries regarding E-tendering system please refer https://organization.maharashtra.nextprocure.in & Contact helpline no.9356468309,9356492848 &7506797596 | |

Sd/-
Dean,
Government Medical College,Satara

ई-निविदेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| ई-निविदा डाऊनलोड करणेचा व भरणेचा कालावधी | दिनांक 14/03/2022 पासून दिनांक 11/04/2022 रोजी वेळ सायं.17.00 पर्यंत. |
| तांत्रिक लिफाफा "अ" प्रपत्र उघडणेचा कालावधी | दिनांक 17/04/2022 रोजी नंतर मा.अधिष्ठाता कार्यालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे उघडण्यात येतील. |
| ई-निविदा उघडणेस सक्षम अधिकारी | मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे उघडण्यात येतील. |

Sd/-
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सातारा

ई-निविदेतील “अ” प्रपत्रामध्ये सादर करावयाचे कागदपत्रे

01.किमान 300 कर्मचारी नोंद असलेला लेबर कंत्राटी कायदा 1970 चा परवाना सादर करणे आवश्यक आहे.

02. मा.अधिष्ठाता, शावैम सातारा (Dean, Government Medical College,Satara) यांचे नावे बयाणा अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे पदसंख्याप्रमाणे एकूण किंमतीनुसार नमूद रक्कमेचा तीन टक्के रक्कम ऑनलाईन भरुन पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

03. तसेच यशस्वी निविदा धारकाने सुरक्षा ठेव रक्कम ही एकुण निविदा रक्कमेच्या बयाणा रक्कमेसह एकुण पाच टक्के रक्कम ही सुरक्षा ठेव रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. सादर करणे बंधनकारक राहिल, त्याशिवाय कामाचे आदेश निर्गमित केले जाणार नाही याची कल्पना आहे.

04.भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 चा परवाना असणे आवश्यक आहे व किमान 300 कर्मचा-याचे मागील 12 महिन्याचे ई.पी.एफ भरले असल्याबाबतची चलने व ई.सी.आर.प्रती सादर करणे आवश्यक आहे.

05.राज्य कामगार विमा अधिनियम 1974 चा परवाना असणे आवश्यक असून किमान 300 कर्मचा-याच मागील 12 महिन्याचे चलने व ई.सी.आर.सादर करणे आवश्यक आहे.

06. जी.एस.टी.रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. तसेच डिसेबर 2021 पर्यत ची जी.एस.टी. भरलेबाबतचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

07. मागील सलग तीन वर्षाची आर्थिक उलाढाल प्रतिवर्ष किमान रुपये 1 कोटी 50 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असावी व तसा मागील तीन वर्षाचा (2018-19, 2019-20,2020-21) चार्टर्ड अकांटेटचा दाखला UDIN NO. सह सादर करणे आवश्यक आहे.

08. सरकारी/निमसरकारी संस्थेच्या किमान 300 खाटाच्या रुग्णालयातील तत्सम कामाचा /बाहयस्त्रोताद्वारे काम केल्याचा अनुभव, आदेश( Work Order) व कामपूर्ण अथवा समाधानकारक केले असलेबाबतचा किमान 2 वर्षाचा दाखला सादर करणे आावश्यक आहे.

09. राष्ट्रीयकृत बँकेची बॅक सोलव्हंसी किंमत रुपये 1 कोटी 50 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

10.मागील सलग तीन वर्षाचा आयकर भरल्याचा दाखला (आय.टी.आर) (2018-19,2019-20,2020-2021) सादर करणे आवश्यक आहे.

11. ठेकेदाराचे प्रतिज्ञापत्र आणि हमीपत्र व सोबत दिलेल्या मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्रामध्ये स्वाक्षरी व शिक्यासह सादर करणे आवश्यक आहे.

12. टेंडर मधील बंधपत्रात नमूद अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्रामध्ये स्वाक्षरी व शिक्यासह सादर करणे आवश्यक आहे.

13. पार्टनरशिप असल्यास त्याबाबतचे पार्टनरशिप डीड झालेबाबत करारपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच पार्टनरशिप(भागीदारी) मधील डीड रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक आहे.

14. मुंबई दुकाने अधिनियम 1948 (शॉप ॲक्ट ) अंतर्गत नोंदणी परवाना पत्र सादर करणे आवश्यक आहे.

15. संस्थेचे/प्रोप्रायटरचे पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे. वैयक्तिक अनुज्ञेय नाही.

16.अर्ज/निविदा प्रक्रिया शुल्क रुपये 5000/- (ना-परतावा) ऑनलाईन स्वरुपात भरणे क्रमप्राप्त आहे. यासाठी खातेदाराचे नाव- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा( Dean,Government Medical College satara) बँकेचे नाव.-बॅक ऑ बडोदा शाखा-सातारा, खाते क्र. 04420100028804, IFSC code- BARB0SATARA (Fifth character is zero ) बँकेचा दुरध्वनी क्र.02162-234184. निविदा अर्जासोबत सादर रक्कम भरलेचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहिल.

टिप- बयाणा रक्कम शुल्क ही अनुक्रमांक 16 वरील प्रमाणे खात्यात भरु नये. सदर बयाणा रक्कम ही खातेदाराचे नाव- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा ( Government Medical College, Satara) यांचे नावे बँक ऑफ बडोदा शाखा सातारा येथील खाते क्रमांक-04420100028040 , IFSC code- BARB0SATARA (Fifth character is zero ) बँकेचा दुरध्वनी क्र.02162-234184. सा यांचे नावे निविदा अर्जासोबत सदर रक्कम भरलेचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहिल.

निविदाधारकाचे/संस्थेचे नाव:

निविदाधारकाची स्वाक्षरी, संस्थेचा शिक्का

ई-निविदा क्र.1

ई-निविदेतील अटी व शर्तीनुसार महाविद्यालयाकरीता वर्ग 3 ( तांत्रिक –अतांत्रिक) बाहयस्त्रोताद्वारे काल्पनिक पदे उपलब्ध करुन देण्याकरीता "अ" प्रपत्रात सादर करावयाचे

बंधपत्र (करारनामा)

नियम , अटी व शर्ती

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. पदनि-2019/प्र.क्र.12/(भाग-1)/2019/वैसेवा-2 मुंबई 400001 दिनांक 01.02.2021 अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे या संस्थेकरीता काल्पनिक पदे वर्ग 3 (बाहयस्त्रोताने ) एकत्रित रुपये 10,000/- वेतनवार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेकरीता निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तींचे अधिन राहून, सुविधा राबविण्याचे मी लिहून देणार मान्य करीता आहे.

सबब, प्रस्तुत बाबत संस्थेची गैरसोय होऊ नये व दैनंदिन प्रशासकीय कामे सुरळीत पार पडणे शक्य व्हावे याकरीता दिनांक 01.02.2021 रोजीचा शासन निर्णय व दिनांक 11/02/2022 रोजीच्या श्री. सु.द. धोंडे, कक्ष अधिकारी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचे कार्यालयाचे क्र.संकीर्ण 1022/प्र.क्र.15/वैसेवा-4 नुसार प्रदान केलेल्या आदेशाचे अनुपालन करुन, भविष्यात कोणत्याही टप्प्यावर शासन स्तरावरुन सेवा पुरवठादाराची नियुक्ती केल्यास आपले आदेश तात्काळ संपुष्ठात येतील अथवा वेतन देयक रक्कमेत बदल झाल्यास आपणा निर्गमित केलेल्या नियुक्तीच्या आदेशाद्वारे देण्यात आलेली मान्यता रदद समजण्यात येईल. व पुनश्च निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. तसेच बदलेल्या वेतन देयक रक्कमेबाबत कोणत्याही प्रकारे हक्क सांगता येणार नाही तसेच आपल्या संस्थेस शासनामार्फत जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे मला सदर मनुष्यबळ पुरवठयाची देयके अदा होतील. व देयका बाबत कोणतेही न्यायालयीन बाब मी लिहून देण्यार,निर्माण करणार नाही याची मला जाणीव करुन देण्यात आलेली आहे.

त्याअनुषगांने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासनाच्या मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय कामकाजात सेवासुविधा करीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देणार आहे.

01. निविदा प्रक्रियेत यशस्वी निविदाधारक म्हणून आपल्या संस्थेस ( संस्थेचे नाव) सदर वर्ग 3 ( तांत्रिक –अतांत्रिक) मनुष्यबळ सुविधा पुरविण्याकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा या संस्थेतील मा.अधिष्ठाता मार्फत निवड करण्यात आली असून, मी स्वता: निविदाधारक अथवा संस्थेने स्वाक्षरी करण्याकरीता प्राधिकृत केलेला प्रतिनिधी असल्याने, खालील प्रमाणे अटी शर्ती आम्हांस/संस्थेस मान्य असून शासन/प्रशासन/संस्थेने विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून, माझ्या/आमच्या संस्थेच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा या संस्थेस (बाहयस्त्रोताद्वारे) शैक्षणिक आर्हता व अनुभवी असलेले मनुष्यबळ प्रशासकीय विविध विभागीय कामकाज करण्या करीता एकत्रित रुपये 10000/- ( दहा हजार फक्त ) वेतनावर ठेका/कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता निविदा प्रक्रियेतील अटीनुसार करारनामा लिहून देत आहे.
02. सदर करारनामा वर्क ऑर्डर मिळालेपासून सात दिवसाच्या आत रुपये 500/- इतक्या रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर रजिस्टर्ड नोंद करुन देणे आवश्यक आहे. करारनाम्यातील कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग झाल्यास मंजूर केलेला ठेका कोणतीही पूर्व सूचना न देता रदद करण्यात येईल, यास लिहून देणार माझी/संस्थेची कोणतीही हरकत राहणार नाही. तसेच निविदेतील अटी शर्तीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा या संस्थेतील बाहयस्त्रोत काल्पनकि वर्ग -3 संवर्गातील 49 पदांच्या शासनाने विहित केलेल्या एकूण निविदा रक्कमेच्या 3 टक्के बयाणा रक्कम रु.176400/- ( एक लाख शहात्तर हजार चारसे रुपये फक्त) (परतावा) इतकी रक्कम भरलेबाबत पुरावा सादर करणे व यशस्वी झाल्यास ठेकेदाराने बयाणा रक्कमेसह पाच टक्के ( 5%) प्रमाणे सुरक्षा ठेव राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी या संस्थेच्या रोखपाल विभागात भरुन रितसर शासकीय शुल्क पावती सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा दिलेले आदेश रदद करण्यात येईल याची लिहून देणार मला जाणीव आहे.
03. ठेकेदार यांना 21 वर्ष वयापेक्षा कमी वयाचे कर्मचारी नियुक्ती करता येणार नाही.
04. पात्र व यशस्वी ठेकेदारांना शासन निर्णय क्र. पदनि-2019/प्र.क्र.12/(भाग-1)/2019/वैसेवा-2 मुंबई 400001 दिनांक 01.02.2021 अन्वये(महाविद्यालय पद निर्मिती) नुसार आदेशीत केलेले वर्ग-3 (काल्पनिक पदे/बाहयस्त्रोताने) आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात येईल.

(महाविद्यालय पद निर्मिती) नुसार

| अ.क्र. | पदाचे नाव | एकत्रित वेतन | आवश्यक पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कलाकार | 10,000/- एकत्रित | 1 |
| 2 | ग्रंथालय सहाय्यक | 10,000/- एकत्रित | 1 |
| 3 | कनिष्ठ लिपीक | 10,000/- एकत्रित | 3 |
| 4 | तंत्रज्ञ | 10,000/- एकत्रित | 16 |
| 5 | प्रयोगशाळा सहाय्यक | 10,000/- एकत्रित | 10 |
| 6 | सुतार | 10,000/- एकत्रित | 1 |
| 7 | प्लंबर | 10,000/- एकत्रित | 1 |
| 8 | वाहन चालक | 10,000/- एकत्रित | 2 |
| 9 | लघुलेखक | 10,000/- एकत्रित | 8 |
| 10 | लघुटंकलेखक | 10,000/- एकत्रित | 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | आरोग्य प्रचारक | 10,000/- एकत्रित | 1 |
| 12 | आरोग्य निरीक्षक | 10,000/- एकत्रित | 2 |
| एकुण पदे | | | 49 |

05. तसेच ठेकेदाराने व्यवसायाच्या अनुषगांने जे कोणतेही शासकीय कर/शुल्क/वर्गणी ई.(EPF,ESIC,GST,EWF,IT,PT,etc. Govt.Dept.) हे विहित कालावधीत शासनाच्या संबंधीत विभागाकडे भरण्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहिल. याबाबत अथवा यासदर्भात कोणतेही वाद/तक्रार निर्माण झाल्यास त्याचे निराकरण ठेकेदाराने संबंधीत शासन विभागाकडून घेणे आवश्यक आहे. त्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा जबाबदार असणार नाही. याबाबत कंत्राटी कर्मचा-याचे मुलभूत हक्काची पायमल्ली झाल्याची तक्रार निर्माणा झाल्यास व तसे सिध्द झाल्यास आपणांवर जबाबदारी निश्चित करुन तात्काळ संस्थाप्रमुखा मार्फत कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे.
06. दैनंदिन प्रशासकीय कामाकरीता वरील 49 पदापैकी या संस्थेस आवश्यकतेनुसार टप्प्याने तसेच शासन नियमाप्रमाणे शैक्षणिक आर्हता व अनुभवी असलेले मनुष्यबळ उपलब्ध करुन घेतले जातील त्याचप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ आवश्यकतेनुसार प्रशासनाच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
07. महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाजाची वेळ संबंधीत विभागाचे विभागप्रमुख व मा.अधिष्ठाता वेळोवेळी केलेल्या सुचनेप्रमाणे पालन करणे बंधनकारक राहिल.
08. महाविद्यालयील सर्व प्रशासकीय कामे विहित वेळेत व जबाबदारीने शिष्टाचाराने पार पाडणे बंधनकारक राहिल.
09. महाविद्यालयातील कंत्राटी कर्मचा-याना लिहून देणार यशस्वी ठेकेदार/कंपनी यांनी गणवेश व ओळखपत्र पुरवावे लागेल.
10. प्रत्यक्षात ज्या तारखेपासून कामाचे आदेश निर्गमीत करण्यात येईल त्या तारखेपासून पुढील 11 महिन्याकरीता अथवा संचालनायाच्या /वरिष्ठ कार्यालयाकडून बाहस्त्रोताबाबतचे आदेश येईपर्यत (जे अगोदर होईल ते) तांत्रिक खंड देऊन समाधानकारक काम असल्यास संबंधीत ठेकेदारास मुदत वाढ देण्याबाबत प्राध्यान्याने विचार केला जाईल .
11. भविष्यात निविदाधारकामार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना स्थायी अथवा इतर कोणतेही शासकीय फायदे मिळणार नाहीत. तशा पध्दतीचा कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयात दाद मागता येणार नाही.
12. ठेकेदार यांना संबंधीत विभागप्रमुख व मा.अधिष्ठाता यांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे जाबाबदारीने पारपाडण्याकरीता कंत्राटी कर्मचारी यांना लिहून देणार यांनी वेळोवेळी सुचत करणे बंधनकारक राहिल.
13. ठेकेदारांनी प्रत्यक्ष नेमलेल्या कर्मचा-याचे दरमाह वेतन प्रत्येक महिन्या 5 तारखेपर्यत धनादेश/बॅक खातेद्वारे अदा करणे आवश्यक राहिल. व त्या बाबतचा अहवाल अधिष्ठाता कार्यालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा येथे सादर करणे बंधनकारक राहील. कंत्राटी कर्मचा-याना विहित कालावधीत संबंधीत ठेकेदाराने वेतन अदा करणे क्रमप्राप्त राहणार आहे, त्यास विलंब झाल्यास संबंधीत लिहून देणार ठेकेदारावर संस्था प्रमुखामार्फत कारवाई होईल त्यास लिहून देणार संबंधीत ठेकेदार यांना कोणतीही हरकत राहणार नाही याची जाणीव आहे.
14. निविदाधारकाचे काम असमाधनकारक असल्यास कोणतेही कारण न दर्शविता कुठल्याही क्षणी करार रदद करण्यात येईल. त्यास लिहून देणार संबंधीत ठेकेदार यांना कोणतेही हरकत राहणार नाही. जाणीव आहे.
15. कंत्राटी कामगाराच्या सुटटीच्या दिवशी दुसरा कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ठेकेदाराचे राहील.
16. प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचे देयक हे (5 तारखेपर्यत) मान्य दराप्रमाणे कार्यालयास सादर करावे. त्यावर उपलब्ध अनुदानाच्या आधारे रक्कमा प्रदान करण्याआधी दिल्या गेलेल्या सेवेचा आढावा घेण्यात येईल व काम समाधानकारक असल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. तसेच कंत्राटी कामगारांकडून सेवेच्या दरम्यान शासकीय संपत्तीने नुकसान झाल्यास त्याची रक्कम सदर देयकातुन वजा करण्यात येईल.
17. अनुदानाअभावी अथवा तांत्रिक अडचणीमुळे देयक अदा करण्यात विलंब झाल्यास देयकावर कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करण्यात येणार नाही अथवा त्याबाबत न्यायालयात बाब निर्माण/उदभवणार नाही याची लिहून देणार हमी देत आहे.
18. लिहून देणार कंत्राटदाराद्वारे कामावर असलेल्या अथवा कंत्राटदाराचे संस्थेमार्फत काम करणा-या कर्मचाऱ्याचे कोणत्याही मनुष्यबळाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.
19. पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या कंत्राटी सेवकांच्या सुरक्षिततेबाबतची जबाबदारी लिहून देणार पुरवठादार यांची संस्थेची राहिल.
20. आपणास वरील सर्व अटी शर्ती मान्य आहे असे गृहीत धरुन तसेच आपण कार्यालयास सादर केलेला कागदपत्राच्या आधारावर पुढील कार्या-देश निर्गमीत करण्यात येतील.
21. उपरोक्त करार हा कोणत्याही टप्प्यावर रदद करणे/मुदत वाढविणे/दंड शुल्क लावणे इ. बाबतचा सर्व अधिकार संस्थाप्रमुख यांनी राखून ठेवलेबाबत लिहून देणार यांना जाणीव आहे.
22. कर्मचाऱ्यांची कोणतीही पोलीस तक्रार नसल्याबाबत व फौजदारी प्रकरण न्यायालयात नसल्याबाबत पोलीसांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे लिहून देणार ठेकेदार यांना बंधनकारक राहिल.
23. कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता तपासून घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही लिहून देणार कंत्राटदाराची राहील व कर्मचारी रुजू करताना शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे मा. अधिष्ठाता कार्यालयात मान्यतेकरीता सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच मा.अधिष्ठाता व बाहयस्त्रोत कर्मचारी नियोजन समिती व्यतिरीक् कंत्राटी कर्मचारी नियुक्त केल्यास त्यांचे वेतनाची जाबाबदारी संबंधीत लिहून देणार संस्थेची/एजेन्सीची राहिल याची मला जाणीव आहे.

24. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित सर्वोचार रुग्णालयात या दोन्ही संस्थेचे संस्थाप्रमुख हे मा.अधिष्ठाता म्हणून एकच असल्याने या दोन्ही संस्थे अंतर्गत दैनंदिन कामकाज करीत असताना संस्थाप्रमुख यांनी या संस्थेच्या अधिनस्त कोणत्याही संस्थेत /विभागात बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना/आदेशित केल्यास सदर कामाबाबत कोणताही प्रश्न उपस्थित न करता अंमलबजावणी करणे लिहून देणार यांना बंधनकारक राहील.
25. संबंधीत कंपनी /एजेन्सी/संस्था यांचे मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी यांचे मासिक वेतनातून शासन नियमानुसार करण्यात आलेल्या कपाती व प्रत्यक्ष हाती मिळणारे वेतन इत्यादीचा तपशील असलेले वेतन चिठठी संबंधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा उपलब्ध करुन देणे आवश्यक असून त्याबाबतचा गोषवारा तक्ता ठेकेदाराने कंपनीच्या मुख्यपत्रावर स्वाक्षरीसह तसेच मागील महिन्याचे EPF,ESIC व इतर शुल्क/वर्गणी भरलेबाबतचे चलन आणि ECR प्रत दरमहा देयाकासोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सादर केलेले देयक पारीत करण्यात येणार नाही याची लिहून देणार यांना जाणीव आहे.
    - मा.आयुक्त, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण वसंशोधन, मुंबई वतीने करारावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांना दिलेला आहे.
    - सदर ई-निविदा प्रक्रिया राबविताना खालीलप्रमाणे अंतिम निर्णय घेण्यात येईल, याबाबतचे सर्वस्वी अधिकार मा. अधिष्ठातांना राहतील.
    - या महाविद्यालयाकरीता बाहयस्त्रोत कंत्राटी काल्पनिक पद संख्या 49 इतकी आहे. त्यामध्ये वेगवेगळी संवर्ग असून, या संस्थेतील प्रशासकीय व स्वच्छतेची दैनंदिन कामे सुरळीत पार पाडण्यासाठी पुरवठादाराचा अनुभव अत्यंत आवश्यक आहे. यासाठी कागदपत्राच्या परिपुर्णतेसह अनुभवास प्राधान्यक्रमानुसार कामाचे आदेश निर्गमित केले जाईल याबाबत निविदरधारकांना जाणीव करुन देण्यात येत आहे.
    - निविदाधारकांनी शासकीय रुग्णालयातील जास्तीत जास्त मंजूर असलेल्या खाटांच्या संख्येप्रमाणे कामाचा अनुभव असल्यास प्राधान्याने विचार केला जाईल, यांची कल्पना देण्यात येत आहे.
    - सर्व निविदा धारकांनी अटी व शर्ती वाचल्या व समजल्या या धारनेने सदर ई-निविदा प्रक्रियेनंतर संबंधीत अयशस्वी निविदाधारकांना हरकत राहणार नाही यांची जाणीव करुन देण्यात येत आहे.

सदर ई-निविदा प्रक्रियेनंतर आवश्यक असलेले ठेकेदारांची संख्या (यशस्वी ठेकेदार) ठरविणेचे सर्वस्वी अधिकार संस्थाप्रमुखांना राहणार आहे. याची कोणतीही हरकत निविदाधारकांना राहणार नाही याची जाणीव आम्हाला आहे.

वरील अनुक्रमे क्र.01 ते 25 अंतर्गत नमूद सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून, त्या मला मान्य व बंधनकारक आहे. सदरचा करारनामा लिहून देणार व लिहून घेणार या दोघांनाही मान्य असून , तो आज दिनांक / /2022वार रोजी लिहून दिला आहे.

साक्षीदार-

लिहून घेणार स्वाक्षरी:
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा

सही -
नाव-
पत्ता-
ठिकाणी-
दिनांक-

साक्षीदार-

लिहून देणार स्वाक्षरी

सही
नाव
पत्ता
ठिकाणी
दिनांक